

एमडीआर रस्त्याला विरोध कायम » पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड




आरसीबीवर पुढच्या आयपीएलसाठी बंदी? » पान ४ वर

वेर्णा, रविवार, ८ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 276 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 8 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# महाराष्ट्रातील मतदानात 'फिक्सिंग' झाल्याचा राहुल गांधींचा आरोप

नवी दिल्ली, दि. ७ :

**काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीनंतर मतदानाच्या टक्केवारीत अचानक झालेली ७.८३ टक्क्यांची वाढ ही अभूतपूर्व घटना असल्याचे सांगत निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी ही निवडणूक मॅच फिक्स असल्याचा गंभीर आरोप करत, लोकशाहीसाठी हे धोका असल्याचे म्हटले आहे.**

याबाबत इंडियन एक्स्प्रेसमध्ये त्यांनी लिहिलेल्या लेखात निवडणूक प्रक्रियेत पाच टप्प्यांमध्ये झालेले कथित षड्यंत्र उघड केले. या टप्प्यांमध्ये त्यांनी पुढील मुद्द्यांचा उल्लेख केला आहे : एकतर्फी निवडणूक आयुक्तांची नियुक्ती, बनावट मतदारांची नोंदणी, बनावट मतदान, टार्गेट बुथ रिगिंग आणि सीसीटीव्ही पुराव्यांचे दडपण या मुद्द्यांना त्यांनी हात घातला आहे

राहुल गांधी यांच्या मते, २०२३ मध्ये झालेल्या कायद्यातील सुधारणांमुळे निवडणूक आयुक्तांची नियुक्ती आता पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांच्या बहुमताने केली जाते, ज्यामुळे विरोधी पक्षनेत्यांचे मत फक्त औपचारिक राहते. न्यायाधीशांच्या उपस्थितीवरही केंद्र सरकारचा प्रभाव असल्याचा आरोप त्यांनी केला.

दुसऱ्या मुद्द्यात, महाराष्ट्रात मे २०२४ मध्ये मतदारांची संख्या ९.२९ कोटी होती, तर नोव्हेंबरमध्ये ती ९.७० कोटींवर गेली. अवघ्या सहा महिन्यांत तब्बल ४१ लाख नव्या मतदारांची भर पडल्याचा दावा करत राहुल गांधी यांनी यात फक्त १५ लाखांनी मतदान केल्याचे सांगितले. उर्वरित २६ लाख मतदार हे संशयास्पद असल्याचा आरोप त्यांनी केला.

राहुल गांधी म्हणाले की, मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झाले होते, जे अंतिम टप्प्यावर ६६.०५ टक्क्यांपर्यंत पोहोचले. ही ७.८३ टक्क्यांची अनैसर्गिक वाढ असून सुमारे ७६ लाख बनावट मते घालण्यात आली असावीत, असा आरोप त्यांनी केला.





▶ निवडणूक आयोगाने गांधी यांचे आरोप फेटाळले

▶ भाजप नेत्यांची कठोर टीका : राहुल गांधी खोटारडे – फडणवीस

राहुल यांनी ८५ विधानसभा क्षेत्रांमध्ये टार्गेट बुथ रिगिंग झाल्याचा दावा केला आहे. काही ठिकाणी भाजपला मिळालेल्या मतांचे प्रमाण अत्यंत अवास्तव असल्याचे ते म्हणाले. उदाहरणादाखल, कम्भ मतदारसंघात भाजपला १.१९ लाख मते मिळाली असून एकूण मतदारसंख्या १.३४ लाख असल्याचे त्यांनी सांगितले. पारनेर मतदारसंघातही भाजपच्या मतांच्या आकड्यावर त्यांनी संशय व्यक्त केला. राहुल गांधी यांनी आरोप केला की, निवडणूक आयोगाने विरोधकांनी मागितलेले सीसीटीव्ही आणि ईव्हीएम फूटेज देण्यास नकार दिला. १९६१ मधील निवडणूक नियमात सुधारणा करून सीसीटीव्ही डेटाचा खुला प्रवेश रोखण्यात आला. त्यांनी मतदार ओळखपत्रांवर एकसारखे क्रमांक दिसत असल्याचाही उल्लेख केला, जो डुप्लिकेट मतदारांचे निदर्शक असल्याचा दावा आहे.

राहुल गांधी यांच्या आरोपांवर निवडणूक आयोगाने तत्काळ

पान २ ▶

# 'विकसित गोवा २०४७' व्हिजनमध्ये पर्यावरण रक्षणाला अग्रक्रम देण्याची याचिका

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७ :** गोवा सरकारच्या 'विकसित गोवा २०४७' या दूरदृष्टी मोहिमेत पर्यावरण रक्षणाचे मुद्दे अंतर्भूत करावेत, अशी मागणी करणारी एक ऑनलाइन याचिका सुरू करण्यात आली आहे. सध्या राज्य सरकार दीर्घकालीन विकास आराखड्याबाबत जनतेचे अभिप्राय मागवत असून, ही याचिका त्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची ठरत आहे.

या याचिकेच्या माध्यमातून राज्याच्या आर्थिक विकासास चालना देतानाच गोव्याच्या नैसर्गिक वारशाचे जतन करणाऱ्या शाश्वत विकास पद्धतीचा पुरस्कार करण्यात आला आहे. आयोजकांनी असा युक्तिवाद मांडला आहे की, विकास आणि पर्यावरण यामध्ये संघर्ष न होता समन्वय साधता येऊ शकतो. त्यासाठी त्यांनी भविष्यातील नियोजनास दिशा देणारी पाच मूलभूत तत्त्वे अधोरेखित केली आहेत.

या पाच तत्त्वांमध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश आहे :

नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण ज्यामध्ये जंगले, नद्या, वन्यजीव, पाणी, माती आणि हवा यांचे संवर्धन करणे आणि सार्वजनिक आरोग्यासाठी त्याचे महत्त्व अधोरेखित करणे तसेच विकास प्रक्रिया स्थानिक समुदायांच्या सशक्त सहभागातूनच यशस्वी होऊ शकते, असे मानून निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा समावेश करण्यावर भर देणे , तिसरा मुद्दा म्हणजे पर्यावरण–स्नेही पर्यटन, जैविक शेती, नवीकरणीय ऊर्जा, आणि शाश्वत बांधकाम क्षेत्रात रोजगारनिर्मितीला चालना देण्याचा आग्रह धरणे ,चौथा महत्वाचा मुद्दा म्हणजे विकास प्रकल्पांमध्ये पारदर्शक डेटा वापरणे आणि नियामक अंमलबजावणीसाठी कायदेशीर व्यवस्था सक्षम करणे आणि गोव्याची जीवनशैली, पारंपरिक मूल्ये आणि सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी विकासाचे स्वरूप संवेदनशील असावे या प्रमुख मुद्द्यांचा समावेश आहे.

या याचिकेचे उद्दिष्ट १०,००० स्वाक्षऱ्या संकलित करण्याचे असून, त्रीशशपतळझीळींत्रेख या हॅशटॅगखाली ही मोहीम सोशल मीडियावर राबवली जात आहे. मोहीम आणि याचिकेचे संपूर्ण तपशील रलींषीसेरं.ीस/सीशशर्पींळझीळींसेर या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. येथे पर्यावरण, अर्थशास्त्र आणि सामाजिक घडामोडींचे अभ्यासक आणि तज्ज्ञांनी सुचवलेल्या शिफारसीही समाविष्ट आहेत.

या उपक्रमाचे एक महत्त्वाचे वैशि÷ष्ट्य म्हणजे, सरकारी सल्लामसलतीच्या प्रक्रियेत नागरिकांना प्रभावीपणे सहभागी होण्यासाठी विशेष मार्गदर्शक संसाधनेही तयार करण्यात आली आहेत. सरकारने या अभिप्राय सल्लामसलतीची अंतिम मुदत ३० जून निश्चित केली आहे.

## निवडक

### सत्यपाल मलिक यांची प्रकृती चिंताजनक

**श्रीनगर, दि. ७ :** जम्मू आणि काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना दिल्लीतील डॉ. राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना मूत्रमार्गाच्या संसर्गाशी संबंधित गंभीर गुंतागुंत आहे ज्यामुळे आता मूत्रपिंड निकामी झाले आहे, असे सूत्रांनी इंडिया टुडे टीव्हीला सांगितले. ११ मे रोजी मलिक यांना तीव्र वेदना आणि लघवी करण्यास त्रास होत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सत्यपाल मलिक यांच्या जवळच्या सहकाऱ्याने पुष्टी केली आहे की त्यांच्या दोन्ही मूत्रपिंडांनी आता काम करणे थांबवले आहे आणि त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. सुरुवातीला त्यांना मूत्रमार्गाच्या संसर्गाचे निदान झाले होते, परंतु आता संसर्गामुळे त्यांच्या मूत्रपिंडांना गंभीर नुकसान झाले आहे, असे आरएमएल रुग्णालयातील एका वरिष्ठ डॉक्टरने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. आम्ही शक्य तितके सर्व काही करत आहोत, परंतु परिस्थिती खूपच गंभीर आहे, असे सूत्रांनी सांगितले.

---

### उत्तर सिक्किममधील हवाई बचाव मोहीम पूर्ण

**गंगटोक, दि. ७ :** उत्तर सिक्किममधील छातेन येथून सुरु असलेली हवाई बचाव मोहीम आज शनिवारी सकाळी एमआय–१७ हेलिकॉप्टरच्या शेवटच्या उड्डाणासह पूर्ण झाली. अंतिम उड्डाणात, एमआय–१७ हेलिकॉप्टरने सैन्याच्या जवानांना पाक्योंग ग्रीनफिल्ड विमानतळावर सुरक्षित पोहोचवले. पाक्योंग येथील जिल्हा माहिती अधिकारी यांच्या माहितीनुसार, शनिवारी ३ एमआय–१७ हेलिकॉप्टरद्वारे एकूण ७६ सैनिकांना पाक्योंग ग्रीनफिल्ड विमानतळावर आणण्यात आले. यानंतर छातेन परिसरातून समन्वय साधून चालवण्यात आलेली ही बचाव मोहीम पूर्ण झाली आहे. शुक्रवारीच उत्तर सिक्किममध्ये अडकलेल्या सर्व पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले होते. आपत्तीग्रस्त भागांतून सुमारे २००० पर्यटक आणि स्थानिक रहिवाशांचा यशस्वीरीत्या बचाव करण्यात आला. शनिवारी सकाळी उत्तर सिक्किममध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे सुरू असलेल्या मदत आणि बचाव कार्याच्या पार्श्वभूमीवर, २ एमआय–१७ हेलिकॉप्टरने आवश्यक मदत सामग्री घेऊन पाक्योंग विमानतळावरून उड्डाण केले. यामध्ये अन्न व नागरी पुरवठा विभागाचे पाच अधिकारी तसेच लष्कर व नागरिकांसाठी एकूण १३०० किलो मदत सामग्री पाठवण्यात आली.

---

### श्रीनगरमधील जामा मशीद सलग सातव्या वर्षी बंद

**श्रीनगर, दि. ७ :** स्थानिक अधिकाऱ्यांनी सोमवारी जुन्या शहरातील ऐतिहासिक जामा मशिदीत सलग सहाव्या वर्षी ईदची नमाज अदा करण्यास परवानगी नाकारली, असे अंजुमन औकाफ जामा मशिदीने येथे सांगितले. आज फजरच्या नमाजानंतर, पोलिस कर्मचाऱ्यांनी श्रीनगरमधील जामा मशिदीचे दरवाजे बंद केले आणि औकाफला कळवले की सकाळी ९:०० वाजता मशिदीत ईदची नमाज अदा करण्यास परवानगी दिली जाणार नाही, असे १४ व्या शतकातील मशिदीच्या व्यवस्थापन मंडळाने एका निवेदनात म्हटले आहे. ईदचे प्रवचन देणारे मीरवाईज उमर फारूख यांनाही घरात नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे . २०१९ पासून अधिकाऱ्यांनी जामा मशीद आणि ईदगाह येथे ईदची नमाज अदा करण्यास बंदी घातली आहे. मिरवाईज यांनी या नकाराला मुस्लिमांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे त्रासदायक उल्लंघन म्हटले.

# 'जीएमसी' मधील डॉक्टरचा आरोग्य मंत्र्यानी केला 'करेक्ट कार्यक्रम'

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** बांबोळी येथील गोवा वैद्यकीय महाविद्यालयातील (गोमेकॉ) आपत्कालीन विभागाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या उद्धट वर्तनामुळे रुग्णांमध्ये तीव्र संताप आणि त्रास उत्पन्न झाला आहे. या गंभीर तक्रारींवर त्वरित कारवाई करत आरोग्यमंत्री विश्वजीत राणे यांनी शनिवारी गोमेकॉच्या डॉ. रुद्रेश या डॉक्टरला तडाकाफडकी निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.

आरोग्यमंत्री राणे यांनी गोमेकॉमध्ये अचानक भेट देऊन वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेश पाटील यांच्यासह या घटनास्थळी पाहणी केली. या भेटीदरम्यान काही रुग्णांनी थेट मंत्र्यांसमोर डॉक्टर रुद्रेश यांच्या अर्वाच्य, उद्धट आणि असभ्य वागणुकीची तक्रार केली. या तक्रारी ऐकल्यानंतर राणे यांनी तात्काळ डॉक्टरला तडजोड न करता फटकारले, तुम्ही डॉक्टर आहात,

▶ **रुग्णांशी उद्धट वागणाऱ्या डॉक्टरचे तडकाफडकी केले निलंबन**

तुमचं बोलणं सुसंस्कृत असले पाहिजे. रुग्णांशी नम्रतेने वागा, अन्यथा घरी चला!

मंत्र्यांनी स्पष्ट सांगितले की, सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांनी आपल्या वर्तनातून सहानुभूती आणि जबाबदारीची भावना दाखवली पाहिजे, अन्यथा अशा उद्धट वर्तनाविरुद्ध कडक कारवाई केली जाईल. रुग्ण ग्राहक नाहीत, ते आपले कर्तव्य आहेत. अहंकार दाखवणे बंद करा, असेही त्यांनी डॉ. रुद्रेश यांना बजावले.

एका रुग्णाने सांगितले की, ईदच्या दिवशी ओपीडी बंद असल्याने इंजेक्शनसाठी कॅज्युलिटीमध्ये आले असता, डॉ. रुद्रेश यांनी स्पष्ट सांगितले की, मी इथे इंजेक्शन देणार नाही, हवं तर आरोग्य केंद्रात जा. अशा असभ्य वर्तनामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

या घटनेनंतर आरोग्यमंत्री राणे यांनी गोमेकॉत काम करणाऱ्या सर्व डॉक्टरांना एक स्पष्ट इशारा दिला आहे की, लोकांची सेवा करणं हे तुमचं प्रमुख कर्तव्य आहे. गोमेकॉसारख्या शासकीय संस्थांमध्ये कोणत्याही डॉक्टराने अशा प्रकारे वागत असेल तर त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

गोमेकॉच्या सूत्रांनी सांगितले की, डॉ. रुद्रेश यांच्याविरुद्ध याआधीही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या आणि या निलंबनाला आरोग्य व्यवस्थेत सुधारणा घडवण्याच्या दृष्टीने मोठे महत्त्व दिले जात आहे. या कारवाईमुळे सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांना जबाबदारीची जाणीव होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आरोग्यमंत्री राणे यांनी या घटनेनंतर पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले, लोकांची सेवा करू शकणारे डॉक्टर गोमेकॉत काम करतील, जे नाहीत त्यांना इथे जागा नाही. तसेच, त्यांनी एमबीबीएस व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या डॉक्टरांना ग्रामीण भागातील इस्पितळात नियुक्त करण्याच्या बॉन्डबाबतही माहिती दिली.

डॉ. रुद्रेश यांना निलंबित करणाऱ्या आदेशावरून आरोग्यमंत्री म्हणाले की , जे काही स्पष्टीकरण द्यायचे असेल ते चौकशी किंवा न्यायालयात द्या, तसा अहंकार आम्ही सहन करणार नाही. रुग्णांशी असभ्य वागणूक देणाऱ्या डॉक्टरांना घरी पाठवणे हे माझे कर्तव्य आहे.

गोमेकॉत सतत रुग्णांची विचारपूस करत, आरोग्यसेवा सुधारण्याच्या उद्देशाने मंत्री राणे काम करत असून त्यांनी डॉक्टरांच्या वेतनवाढीचा मुद्दाही विचारात घेतला आहे. सरकारी आरोग्यसेवेतील दोष दूर करण्यासाठी कठोर आणि प्रामाणिक पावले उचलली जातील असे त्यांनी स्पष्ट केले आहे .

# एल डोराडोच्या स्वतंत्र तपासणीची व्यापाऱ्यांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** पणजीतील एल डोराडो इमारतीतील १० व्यापाऱ्यांनी सक्षम अधिकाऱ्यांकडे स्वतंत्र तांत्रिक तज्ज्ञांच्या मार्फत इमारतीची तपासणी करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भातील सुनावणी शुक्रवारी सचिव (शहरी विकास) तथा सक्षम अधिकारी संजय गोयल (आयएएस) यांच्या समोर पार पडली. या व्यापाऱ्यांचे प्रतिनिधित्व ॲड. रौनक राव यांनी केले.

ॲड. राव यांनी सुनावणीदरम्यान सांगितले की, गोवा अभियांत्रिकी महाविद्यालय, फर्मागुडीच्या अहवालावर आधारित महानगरपालिकेने इमारतीभोवती बॅरिकेडिंग करून व्यापाऱ्यांना बाहेर पडण्यास भाग पाडले. मात्र, या कारवाईपूर्वी व्यापाऱ्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची कोणतीही संधी देण्यात आली नाही. आमच्या मालमत्तांची आतून तपासणीही करण्यात आलेली नाही. या प्रकरणाचा पुढील निर्णय १३ जून रोजी सुनावणीअंती दिला जाणार असल्याचे सक्षम अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

ॲड. राव यांनी यावेळी हेही नमूद केले की, व्यापाऱ्यांना १९९० साली तांत्रिक तज्ज्ञ करंदीकर यांच्याकडून मिळालेल्या अहवालात इमारत पुढील ४४ वर्षांसाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. ही इमारत १९६९ साली उभारण्यात आली होती. मात्र गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये महानगरपालिकेने कोणतीही पूर्वसूचना न देता आणि व्यापाऱ्यांशी कोणताही संपर्क न साधता संरचनात्मक विश्लेषण केल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

याआधी, महानगरपालिकेने २१ मे रोजी एल डोराडो इमारत तात्काळ रिकामी करण्याचा आदेश दिला होता. या आदेशाला आव्हान देत व्यापाऱ्यांनी सक्षम अधिकाऱ्यांकडे दाद मागितली होती. २७ मे रोजी सक्षम अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिला होता, त्यामुळे व्यापाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात रिट याचिका दाखल केली.

न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, अपील निकाली निघेपर्यंत एल डोराडो इमारतीवर कोणतीही तोडकामे केली जाऊ नयेत. तथापि, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जर काही धोका निर्माण झाला, तर सीसीपीला आवश्यक बदलांसाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याची मुभा देण्यात आली आहे.

याशिवाय, व्यापाऱ्यांना त्यांचा माल बाहेर काढता यावा यासाठी इमारतीभोवती उभारलेली बॅरिकेड्स हटवण्याचे निर्देशही महानगरपालिका आयुक्तांना देण्यात आले आहेत.या संपूर्ण प्रकरणाची पुढील सुनावणी १३ जून रोजी होणार आहे.

# गोव्यातील विद्यार्थ्याच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय मान्यता

## फरहान शेख याची झाली जपान दौऱ्यासाठी निवड | 'स्मार्ट डस्टबिन' मॉडेलची झाली निवड

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७ :** आंबावली येथील शासकीय उच्च माध्यमिक शाळेचा विद्यार्थी फरहान शेख याने तयार केलेल्या नाविन्यपूर्ण 'स्मार्ट डस्टबिन' प्रकल्पामुळे त्याची 'इनस्पायर – मानक' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली असून, आता तो भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जपान दौऱ्यावर जाणार आहे. देशभरातील ७ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपैकी केवळ ५४ जणांची निवड या स्पर्धेसाठी करण्यात आली असून, फरहान याचे या यादीत स्थान हे गोव्यासाठी गौरवाची बाब आहे.

फरहान शेख याने आपल्या संकल्पनेचा पाया एका गंभीर निरीक्षणावर आधारलेला आहे. सेंद्रिय कचऱ्यात मिसळलेले प्लास्टिक खाल्ल्यामुळे गुरांवर होणारे दुष्परिणाम त्याने लक्षात घेतले आणि त्यातून ही संकल्पना विकसित केली. गुरे प्लास्टिक खाऊन पचनाच्या समस्यांना आणि मृत्यूलाही सामोरे जातात, हे पाहून मला यावर उपाय शोधण्याची प्रेरणा मिळाली, असे फरहानने सांगितले.

या समस्येवर उपाय म्हणून त्याने तयार केलेले 'स्मार्ट डस्टबिन' हे कलर कोडिंग आणि सेन्सर तंत्रज्ञानाचा वापर करून कचरा योग्य प्रकारे वर्गीकरण करण्यासाठी मदत करणारे आहे. पर्यावरणीय जाणीव आणि डिजिटल नवकल्पना यांचा योग्य मेळ साधणारी ही संकल्पना विविध स्तरांवर कौतुकास पात्र ठरली आहे. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागातर्फे 'नस्पायर – मानक' कार्यक्रम राबविण्यात येतो. शेख याची निवड ही या कार्यक्रमाच्या अत्यंत स्पर्धात्मक टप्प्यांतून झाली असून, त्याची गुणवत्ता आणि कल्पकता अधोरेखित करते.

१५ ते २१ जूनदरम्यान, फरहान शेख जपानच्या साकुरा सायन्स हायस्कूल 'एक्सचेंज' प्रोग्राममध्ये सहभागी होणार असून, त्याला तिथल्या आघाडीच्या संशोधन संस्था, विद्यापीठांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. या दौऱ्यात नोबेल पुरस्कार विजेत्यांच्या व्याख्यानांना हजेरी लावण्याची तसेच जपानी वैज्ञानिक व सांस्कृतिक जगताचा अनुभव घेण्याचीही संधी त्याला मिळणार आहे.



जपानच्या तंत्रज्ञानविषयक दृष्टिकोनातून खूप काही शिकता येईल आणि भविष्यात मी अशाच नाविन्यपूर्ण संशोधनामध्ये योगदान देऊ शकेन, असा आत्मविश्वास त्याने व्यक्त केला.

शेख याच्या यशाबद्दल आंबावली शाळेतील विज्ञान शिक्षिका प्रिया त्रावासो यांनी आनंद व्यक्त करताना त्याला शास्त्रीय संकल्पना समजून घेणारा आणि नवकल्पनांमध्ये सतत रस घेणारा विद्यार्थी असे संबोधले. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती देसाई यांनीही शेखच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला आणि त्याचे श्रेय पालक, शिक्षक व शिक्षण विभागाच्या पाठिंब्याला दिले.

सध्या शेख आपल्या डस्टबिन प्रकल्पाचा प्रोटोटाइप पुढील टप्प्यावर नेण्यासाठी कार्यरत असून, त्याचे उद्दिष्ट स्वयंचलित कचरा वर्गीकरणासाठी एक विस्तृत प्रणाली तयार करण्याचे आहे. ही प्रणाली शहरी कचरा व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

गोवा औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अभिषेक प्रविमल यांनी शेखच्या या प्रयोगशील दृष्टिकोनाचे कौतुक करताना सांगितले की, तो विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करत आहे, ही गोष्ट उल्लेखनीय आहे.

जपानचा साकुरा सायन्स 'एक्सचेंज' कार्यक्रम हा आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक सहकार्याचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्याद्वारे मागील सहा वर्षांत ३३,२०० हून अधिक संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले आहेत.